**F.Y.B.A. SEM – I (CBCS -2016 COURSE) : WINTER - 2017**

**SUBJECT : MARATHI (G1) - I**

Day : **Tuesday**
Date : **07/11/2017**

**W-2017-0007**

Time : **11.00 A. M. TO 02.00 PM**
Max. Marks : 60.

---

**सूचना:**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक गुणांचा निर्देश करतात.
३) मराठी भाषेच्या लेखननियमांनुसार लेखन करणे आवश्यक आहे.

---

प्र.१ अ) पुढीलपैकी योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा. (०६)

१) खंडेनवमीला खडकावरची म्हातारी ----- देवीची पूजा करायची.
(अ) लक्ष्मी (ब) मरीआई (क) अंबाबाई (ड) तुकाई

२) शिवाजी सावंतांना आजऱ्याची ----- माती आठवत राहते.
(अ) लाल (ब) काळी (क) पांढरी (ड) तांबडी

३) ----- या नाटकात तोतरा दत्तूने जिजाबाईची भूमिका केली होती.
(अ) एकच प्याला (ब) शिवसंभव (क) चंद्रग्रहण (ड) समर-झुंजार

४) 'खुदबु' ----- होता.
(अ) मजूर (ब) हमाल (क) कारागीर (ड) शिकारी

५) कोल्हापूर जिल्ह्यातील ----- या गावी शिवाजी सावंतांचा जन्म झाला.
(अ) कागल (ब) आजरा (क) इचलकरंजी (ड) गगनबावडा

६) 'काका गवंडळकर' ----- हा सण आनंदाने साजरा करायचे.
(अ) शिमगा (ब) दसरा (क) गुढीपाडवा (ड) दिपावली

ब) पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (०६)

१) लेखक शिवाजी सावंत 'शंकऱ्या' बरोबर कोणता खेळ खेळायचे?
२) टी. डी. लेखकाला कसा वाटायचा?
३) जयरामला पुण्याच्या कोणत्या मासिकाचे संपादक पद मिळाले?
४) आजरा हे गाव कोणत्या नदीच्या तिरावर आहे?
५) 'संतू' च्या हॉटेलचे नाव काय होते?
६) कमानीच्या खोबणीत नागाने कोणास पकडले होते?

प्र.२ 'व्यक्तिचित्र' या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा. (१२)

**किंवा**

'अशी मने असे नमुने' मधील तुम्हाला आवडलेल्या एका व्यक्तिचित्राविषयी लिहा.

कृ.मागे पहा

प्र.३ पुढीलपैकी कोणत्याही **दोन** विषयांवर विवेचक टीपा लिहा. (१२)

क) म्हैशींच्या शर्यती आणि तातू

ख) 'गणपा'ची शिवाजीची भूमिका

ग) कांत्याचे फलचौर्यकर्म

प्र.४ पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. (१२)

क) माझे पहिले भाषण

ख) नवप्रसारमाध्यमांची लोकप्रियता

प्र.५ अ) मुद्रितशोधनाची आवश्यकता स्पष्ट करा. (०६)

**किंवा**

मुद्रितशोधन कसे करावे, ते लिहा.

ब) मुद्रितशोधनाच्या योग्य त्या खुणा वापरून पुढील उतारा दुरुस्त करा. (०६)

महाराष्ट्रातली जी नीयतकालीके-म्हणजे दैनीके, द्विसाप्ताहीके, साप्ताहिके, मासीके, त्रैमासिके पाक्षिके वगैरे- युध्दापूर्वीच्या काळात भरभराटीत होती, ती युध्दकाळात राहीली नाहीत. नव्या वाचकवर्गाच्या आकांक्षा निराळ्या आहेत. अभीरुची आणि ज्ञानाचे स्वरुप ही बदललेले आहे. या सर्वांचा विचार करुन जी वृत्तपत्रे आपले धोरण आखतील, त्यांनाच यश मिळण्याचा संभव आहे.

**किंवा**

पुढील गोष्टींसाठी मुद्रितशोधनाच्या योग्य त्या खुणा लिहा.

- काना द्या
- काढून टाका
- मात्रा टाका
- रफार
- संयोगचिन्ह
- उद्गारचिन्ह

* * *